"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

## इतिहास विभाग

**************************************************************

**सूचना** दि. 17 / 07 /2019

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग-II च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, शुक्रवार दिनांक 19/07/2019 रोजी इतिहास पेपर क्रमांक –III"आधुनिक युरोपचा इतिहास" या विषयाच्या प्रकरण-2 (फ्रेंच राज्यक्रांती) वरील सरप्राईज टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला रूम नंबर 11 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

डॉ. एस. आर. कट्टीमनी

इतिहास विभाग

(32)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. ३०/ 7 / २०१९

---

वर्ग - बी.ए.- II सेमिस्टर - III

पेपर क्र - III टेस्ट - सरप्राईज टेस्ट

प्रकरणाचे नाव - आधुनिक युरोपचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 5139 | 7 | 10 | | |
| 2 | 5256 | 10 | 11 | | |
| 3 | 5187 | 7 | 12 | | |
| 4 | 5138 | 9 | 13 | | |
| 5 | 5225 | 9 | 14 | | |
| 6 | 5096 | 10 | 15 | | |
| 7 | | | 16 | | |
| 8 | | | 17 | | |
| 9 | | | 18 | | |

विषय शिक्षक स्वाक्षरी

33



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर(स्वायत्त)

## इतिहास विभाग

************************************************************

**प्रश्नपत्रिका** दि.19 / 07 / 2019

बी. ए. भाग-II

सेमिस्टर -IIIपेपर क्रमांक - III

विषय - "आधुनिक युरोपचा इतिहास"

प्रकरण-2 . फ्रेंच राज्यक्रांती

सरप्राईज टेस्ट वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे स्पष्ट करा . (गुण-10)

34

9/10

Page No.
Date 19/7/19

नाव - कोळी ऋतिक राजेंद्र
वर्ग - बी. ए. भाग २ रोल नं - 5138
विषय - इतिहास

प्रश्न :- फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा ?

उत्तर → 1] राजकीय कारणे →

1) ब्युरबॉन घराण्याची जुलमी राजवट ! - फ्रान्सचे क्षेत्रफळ २,१२,००० चौरस मैल असून वातावरण सौम्य व आल्हाददायक आहे. उत्तर युरोप, मध्य युरोप व दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्स मध्ये गेल्याने या देशाला महत्त्व प्राप्त दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्स मधून गेल्याने या देशाला महत्त्व प्राप्त झाले. युरोपातील छोट्या-मोठ्या घटकांचे परिणाम फ्रान्स व समस्त राहीले. १६ व्या शतकाच्या मध्यापासून फ्रान्समध्ये ब्युरबॉन घराण्याची राजवट सुरू झाली. इ. सन १५५३ मध्ये ते १७९३ पर्यंत सुमारे आडीचशे वर्षे या घराण्याने फ्रान्सवर अधिराज्य गाजविले. या घराण्यातील राजे दैवी अधिकाराच्या सिद्धांतचे पुरस्कर्ते होते. कोणत्याही गोष्टीचा कायदेशीर पणा वा बेकायदेशीपणा हा राज्याच्या शब्दावर अवलंबून होता. राजाचा शब्द प्रमाण मानला जाई. ब्युरबॉन घराण्यातील राज्यकर्त्यांचा कालखंड पुढीलप्रमाणे होता.

पहिला ब्युरबॉन राजा चौथा हेन्री सन १५५३ ते १६१०
तेरावा लुई सन. १६१० ते १६४३
चौदावा लुई सन. १६४३ ते १७१५
पंधरावा लुई सन. १७१५ ते १७७४
सोळवा लुई सन. १७७४ ते १७९३

ब्युरबॉन घराण्यातील पहिल्या तीन राज्यकर्त्यांच्या कालखंडात फ्रान्सची शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती झाली. उदयोगाच्या विकास झाला पण नंतर राज्यकर्त्यांच्या युद्ध खोर धोरणामुळे व जुलमी राजवटी मुळे. फ्रान्स मध्ये क्रांतीचा उद्रेक झाला.

35

2) दैवी वरदानाच्या सिद्धांत :- मध्ययुगीन कालखंडा पासून फ्रेंच मधील व्यनियंत्रित राजेशाही उदयास आली होती. राजा स्वत:लाच ईश्वराचा अंश मानत असे परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी आपणास पृथ्वीतलावर पाठविले आहे असे तो मनोमन समजत असे. धर्मच्या पगडा असणाऱ्या जनतेला ही हे मनोमन पटत होते. दैवी वरदानाच्या सिद्धांतामुळे राजाच्या शैरकृत्यावर पांघरूण घालण्यात येई राजाशी द्रोह करणे म्हणजे साक्षात परमेश्वराशी द्रोह करण्यासारखे वाटत होते. थोडक्यात दैवी वरदाच्या सिद्धांत, सत्तेची मक्तेदारी व वंशपरंपरागत प्रथा यामुळे जनतेत प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला.

2] सामाजिक कारणे :-

1) सरंजामदार वर्ग :- क्रांती पूर्व फ्रेंच समाजाची रचना सरंजामशाही स्वरूपाची होती अमीर - उमराव हा फ्रेंच समाजातील पहिला वर्ग होय हा वर्ग अत्यंत सधन व संपन्न जीवन जगत होता. सरंजामदार वर्गाची संख्या फ्रान्सच्या लोकसंख्येच्या शेकडा 9 टक्क्यांहून कमी असूनही यांच्याकडे देशाच्या 60 टक्क्यांहून अधीक जमीन होती. तरीही हा सधन वर्ग करमुक्त होता. एवढेच नव्हेतर या वर्गाचा सर्वसामान्य जनतेवर 'टॅली' (मालमत्तेवरील) नावाचा कर होता. मुलकी व लष्करी प्रशासनातील वरिष्ठ जागा या वर्गाकडे होत्या अशा परिस्थितीमुळे अमीर - उमराव हा वर्ग सम्राटाप्रमाणेच चैन - विलास व ऐषआरामात जीवन जगत होता. सरंजामदार वर्गाकडून सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत होती.

हा वर्ग कुळांकडून खंड वसूल करत असे वेठबिगारांकडून शेतीची कामे करून घेई. सरंजामदारांना शिकारीची शौक भारी, या शौकापायी शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होत असे. ज्यांच्याकडे दाद मागावयाची त्यांच्या कडूनच अन्याय झाल्यास दाद मागणार कोणाकडे ? सरंजामदार वर्गाविषयी मॉंटस्क्यू म्हणतो "राजाशी बोलू शकणारा, मंत्र्यांशी संपर्क साधणारा आणि ज्याला कर्ज आणि पेन्शन त्याचबरोबर वडिलार्जित हक्क आहेत अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय." सरंजामदार वर्गाच्या छळला कंटाळलेली सामान्य जनता क्रांतीसाठी उद्युक्त झाली.

२) धर्मगुरुंच्या वर्ग :- फ्रेंच समाजातील हा दुसरा वर्ग होता.
सरंजामदार वर्गाप्रमाणेच हा वर्ग ही सधन व संपन्न होता. वरिष्ठ, कनिष्ठ व ग्रामीण भागात धार्मिक कार्य करणारे धर्मगुरु अशा प्रकारात यांचे विभाजन झाले होते. वरिष्ठ धर्मगुरु हे आपला बहुतेक काळ राजधानीत घालवत असत. संख्येने अत्यल्प असणाऱ्या या वर्गाच्या हाती धार्मिक स्थळ होती. रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सच्या राष्ट्रधर्म असल्याने सरकार व जनतेवर कॅथॉलिक धर्माचा प्रभाव होता.

धर्मगुरुंची संख्या अत्यल्प असूनही २० टक्के जमीन त्यांच्या ताब्यात होती. उत्पादनाची साधने यांच्या हाती असूनही हा वर्ग करमुक्त होता. धर्मगुरुंना समाजात मान सन्मान, प्रतिष्ठा व सधनता लाभली असल्यामुळे हा वर्ग चैनी, विलासी व अविचारी बनला होता. अशा परिस्थितीत १६ व्या लुईने सुधारणा वादी प्रोटेस्टंट पंथियांच्या मत व पूजा स्वातंत्र्यावर निर्बंध लादले. विचार वंतांनी राजाच्या धोरणावर टिका केली. मिराबेल याने कॅथॉलिक पंथातील दोष व उणिवा दाखवून दिल्या.

३) धार्मिक कारणे :-

१) चैनी, विलासी धर्मगुरुंच्या वर्ग :- रोमन कॅथलिक हा फ्रान्सच्या राष्ट्रधर्म असल्याने राजकर्त्याप्रमाणेच समाजावर त्यांच्या मोठा प्रभाव होता. धर्मगुरुंच्या वर्ग हा प्रस्थापित वर्ग होता. धर्मस्थळे उत्पन्नाची साधने झाली होती. रोममधील पोपपासून खेडेगावातील पाद्र्यापर्यंत धर्मसंस्थेची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. या धर्मसंस्थेची पोप त्या खालोखाल, कार्डिनल, आर्च बिशप, आर्च डीकन बिशप, बीफन ॲबॅट यांची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. फ्रान्स मध्ये सुमारे दिड लाख धर्माधिकारी होते. धर्ममठाची संख्या पाच हजारच्या घरात होती या मठामध्ये पंचवीस हजार अविवाहीत मठवासी तर पस्तीस हजार अविवाहीत मठवासीनींचे वास्तव्य होते. इतर धर्माधिकारी गृहस्थाश्रमी होते. हे सर्वसण धर्मव्यवस्थेचा कारभार चालवत होते.

१६ व्या लुईच्या विरोधामुळे सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाला फ्रान्समध्ये विस्तार करता आला नाही. सेंट बार्थोलो या साधुच्या पुण्यस्मरणदिनी पॅरिस मध्ये एका रात्रीत प्रोटेस्टंट पंथाची मोठी कत्तल करण्यात आली. कॅथलिक

धर्मपंडित यांनी आपली दहशत निर्माण केली. आपल्या धार्मिक कर्तव्यापासून दूर गेलेल्या, धर्मगुरूविषयी जनतेच प्रचंड रोष निर्माण झाला. ज्यांच्याकडे धर्म जागृतीचे कार्य तेच चैनी, विलासी व स्वार्थी बनले होते. धार्मिक मठ ही ऐश्वर्याची व चंगळवादाचीठाणी झाली होती. थोडक्यात (नाव देवाचे अन विलास बुवाचे अशी परिस्थीती निर्माण झाली होती.

4] आर्थिक कारणे :-

1) सरंजामशाही अर्थव्यवस्था :-

कृषी प्रधान फ्रान्सची शेतीची विभागणी अत्यंत विषम पद्धतीने झाली होती. एकूण जमिनिच्या 60 टक्के जमीन अमीर - उमरावांकडे, 20 टक्के धर्मगुरुकडे तर 20 टक्के जमीन 20 लक्ष शेतकऱ्यांकडे होती अमीर उमराव यांची जमीन कसण्यासाठी लक्षावधी मुद्रास राबत होते. उत्पन्नाची साधने मुठभर व्यक्तीच्या हातात एकवटली होती. भुकेल्या लोकांनी भाकरीसाठी व्हर्सायच्या राजवाड्यावर काढलेल्या मोर्चा हे फ्रान्सच्या विदारक आर्थिक परिस्थीतीचे द्योतक होते. सरंजामशाही अर्थव्यवस्था फ्रेंच क्रांतीस कारणीभूत ठरली.

7/10

GoodLuck Page No.
Date 19 / 7 / 19

नाव :- कोळी सुरज विजय. रोल नं. 5139
वर्ग :- बी. ए भाग २
विषय :- इतिहास. [ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे ]
[illegible] उल्लेख केलेले भारतीयांच्या
अभ्यासासाठी कारणे स्पष्ट करा.

प्रश्न फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा?

उत्तर- 1) <u>राजकीय</u> <u>कारणे</u> →

1) बुरबोन घराण्याची जुलमी राजवट :- फ्रान्सचे क्षेत्रफळ 2,12000 चौरस मैल असून वातावरण सौम्य व आल्हाददायक आहे. उत्तर युरोप व पश्चिम युरोपीयन जमीनीकडे जाणारे रस्ते फ्रान्स मधुन गेल्याने या देशाला महत्व प्राप्त झाले. युरोपातील छोट्या मोठ्या घटनांचे परिणाम फ्रान्स व अमहत राहीले 16 व्या शतकाच्या मध्यापासुन फ्रान्समधुन बुर्बोन घराण्याची राजवट सुरू झाली इ.स. 1553 ते 1789 पर्यंत सुमारे अडीचशे वर्षे या घराण्याने फ्रान्सवर शासन गाजविले या घराण्यातील राजे चैनी अधिकाऱ्यांचा विलासतांचा पुरस्कर्ते होते. कोणाचाही लोकांचा [illegible] हा राजाच्या लहरीवर अवलंबुन होता. ~~राजाच्या शब्द प्रमाण मानला जाई~~ बुरबोन घराण्यातील राज्यकर्त्यांचा कालखंड पुढील प्रमाणे होता.

पहिला बुरबोन राजा चौथा हेन्री सन 1589 ते 1610
तेरावा लुई सन :- 1610 ते 1643
पंधरावा लुई सन 1615 ते 1674
सोळावा लुई सन 1674 ते 1793

बुरबोन घराण्यातील पहिल्या तीन राज्यकर्त्यांच्या कालखंडात फ्रान्सची भौतिक व सांस्कृतिक उन्नती झाली उद्योगाच्या विकास झाला पण. नंतर राज्यकर्त्यांच्या ऐषखोर होण्यामुळे व जुलमी राजवटी मुळे. फ्रान्समध्ये क्रांतीचा उद्रेक झाला

② <u>दैवी</u> <u>अधिकाराचा</u> <u>सिध्दांत</u> : मध्ययुगीन कालखंडापासुन फ्रांच मधील अनियंत्रीत राजेशाही उदयास आली होती. राजा स्वतःलाच ईश्वराचा अंश मानत असे परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी आपणास पृथ्वीतलावर पाठविले आहे असे. तो समजत असे राजाच्या सत्ता अमर्याद असणाऱ्या जनतेनेही हे मनोमन पटत असे दैवी अधिकाराच्या सिध्दांतामुळे राजाच्या विरुध्द बंड करणे म्हणजे साक्षात परमेश्वराशी द्रोह. सत्तेची मक्तेदारी व देशप्रशासनात [illegible] यामुळे जनतेत

प्रचंड प्रमेह्न निर्माण झाला।

③ समाजीक कारणे : क्रांतीपुर्व समाजाची रचना संरजशाही स्वरूपाची होती अमीर उमराव हा फ्रेंच समाजातील पहीला वर्ग होय. हा वर्ग अत्यंत संधन व संपन्न जीवन जगत होता. सरंजामदार वर्गाची संख्या फ्रान्सच्या लोकसंख्येच्या केवळ १८ टक्यांहुन कमी असुनही यांच्याकडे देशाच्या ६० टक्यांहुन अधीक जमीन होती तरीही हा संधन वर्ग करमुक्त होता. एवढेच नव्हे, तर या वर्गाचा सर्वसामान्य जनतेवर वेगी (मालमत्तेवरील) लादण्याचा कर होता. मुलकी व लष्करी प्रशासनातील वरिष्ठ जागांच्या या वर्गाकडे होत्या. या परिस्थीतीमुळे अमिर उमराव हा वर्ग समग्रपणाने चैन - विलास व ऐशआरामात जीवन जगत होता.

सरंजामदार वर्गाकडून सर्वसामान्य जनतेची पिळवणुक होत होती. हा वर्ग कुळांकडून खंड वसुल करत असे वेठबिगारांकडून शेतीची कामे करुन घेई. सरंजामदारांना शिकारीचा शौक असे. या शौकापायी शेतकऱ्यांच्या शेता पिकाचे नुकसान होत असे. त्यांच्याकडे पाय समावायाची शांघा करुनच अन्याय सामान्य वर्ग समाजाकडे सरंजामदार वर्गाविषयी मतिमंद वाढला. राजाशी बोलु शकणारा, सत्तावी संपर्क साधणारा आणी ज्याला कर्ज आणी पेन्शन यासह बरोबर वडीलार्जीत हक्क आहेत अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय. सरंजामदार वर्गाच्या छळाला कंटाळलेली सामान्य जनता क्रांतीसाठी उद्युक्त झाली.

② धर्मगुरुच्या वर्ग : फ्रेंच समाजातील हा दुसरा वर्ग होता. सरंमजदार वर्गाप्रमाणेच हा वर्ग ही संधन व संपन्न होता. वरीष्ठ धर्मगुरु हे आपला बहुतेक काळ राजधानीत घालवत असत. बऱ्याचश्या अपल असनांमध्ये या वर्गाच्या हाती धार्मिक व्यक्ती होती. रोमन कॅथोलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने सरकार व जनतेवर कॅथोलिक धर्माचा प्रभाव होता.

धर्मगुरुची संख्या अत्यल्प असुनही २० टक्के जमीन त्यांच्या ताब्यात होती. उत्पादनाची साधने यांच्या हाती असुनही हा वर्ग करमुक्त होता. धर्मगुरुंना समाजात मान, सन्मान प्रतीष्ठा व साधनता लाभली असल्यामुळे हा वर्ग चैनी, विलासी व अविचारी बनला होता. अशा परिस्थीतीत १६ व्या लुईने सुधारणा वादी प्रोटेस्टंट पंथी व पुना स्वातप्रंचर निर्वेध लायले विचार वंतानी राजाच्या धोरणावर टिका केली पिअरबेल यान कॅथेलीक पंथातील दोष व उणीवा दाखवून दिल्या.

GoodLuck | Page No. | Date

धार्मिक कारणे :

1) चैनी विलासी धर्मगुरुंचा वर्ग : रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने राज्यकर्त्यांप्रमाणेच समाजावर यांचा मोठा प्रभाव होता धर्मगुरूंचा वर्ग हा प्रभावशाली वर्ग होता धर्मसत्ते उत्पादनाची साधने झाली होती रोममधील पोप-पासून खेडेगावातील पाद्र्यापर्यंत धर्मसंस्थेची व्यवस्था अशी साखळी निर्माण झाली होती या धर्मसंस्थेत पोप - या खालोखाल, कार्डिनाल, आर्च, बिशप, आर्च डिकन, बिशप डिकन इत्यादी यांची व्यवस्था अशी साखळी निर्माण झाली होती. फ्रान्स मध्ये सुमारे दिड लाख धर्माधिकारी होते. धर्मगुरूंची संख्या पाच हजारांच्या घरात होती, या मठामध्ये पंचवीस हजार अधीनाहीन महाराणी तर पस्तीस हजार अधीनाहीन महंतांसीनाच्चे वास्तव्य होते. इतर धर्माधिकारी सर्वसामान्य होते हे सर्वजण धर्मव्यवस्थेचा कारभार चालवत होते

16 व्या लुईच्या विरोधामुळे सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाला फ्रान्समध्ये विस्तार करता आला नाही. संत बार्थोलोमी या साधुच्या पुण्य स्मरणाची पॅरिस मध्ये एका रात्रीत प्रोटेस्टंट पंथाची मोठी कत्तल करण्यात आली कॅथॉलिक धर्मपंथी यांनी आपली दहशत निर्माण केली आपल्या धार्मिक कर्तव्यांपासून दूर गेल्याने धर्मगुरू विषयी जनतेत प्रचंड रोष निर्माण झाला आणि त्यांच्याकडे धर्म जागृतीचे कार्य तेच ठेवले. विकासी-हानी झाली होती. थोडक्यात 'नाव पैशाचे' अन विनाश धुवांचे अशी परिस्थिती निर्माण झाली होती

(4) धार्मिक कारणे :-

1) सरंजामशाही अर्थव्यवस्था :-

कृषी प्रधान फ्रान्सची शेतीची विभागणी अत्यंत विषम पद्धतीने झाली होती. एकूण जमिनीच्या 20 टक्के जमीन अमीर उमरावांकडे, 20 टक्के धर्मगुरूकडे तर 20% जमीन 60 लक्ष शेतकऱ्यांकडे होती. आमीर उमराव यांची जमीन कसण्यासाठी नेहमीच सुधारस राबत होते. उत्पादनाची साधने मुठभर श्रीमंतांच्या हातात एकवटली होती शुकेल्या लोकांनी भाकरीसाठी कष्टाच्या राजवाड्यावर काढलेला मोर्चा हे फ्रान्सच्या विदारक आर्थिक परिस्थितीमध्ये घातक होते सरंजामशाही अर्थव्यवस्था फ्रेंच क्रांतीस कारणीभूत ठरली आहे

10/10

PAGE NO.:
DATE: 19/7/19

Name :- Rutika Vasant Redekar
Class :- B.A II
Subject :- History
Roll NO :- 5256
Test :- Sem III Assimment

## फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे पुढील प्रमाणे.....

→ अनियंत्रित राजेशाही :-

फ्रान्स मध्ये राज्यक्रांती घडून येण्यास प्रामुख्याने फ्रान्स मधील राजकीय परिस्थिती कारणीभुत ठरली विशेषतः फ्रान्समध्ये लुई घराण्याचे अनियंत्रित राज्यशाहीचा पुरस्कार करून राज्यकारभार केला त्यात १४ वा १५ वा आणि १६ वा लुई यांच्या बेताल वागण्याने भर टाकली यांचा 'राजसत्ता दैवी आहे' या सिद्धांतावर विश्वास होता.

१४ वा लुई अत्यंत घमेंड खोर आणि लहरी होता त्याने सतत युद्धे करून फ्रान्सची तिजोरी रिकामी केली प्रजेला महत्व न देता आपल्या इच्छेनुसार राज्यकारभार केला. परंतु त्या नंतर १५व्या व १६ व्या लुईच्या काळात राजकीय अस्थिरता निर्माण होऊन फ्रेंच क्रांतीची पार्श्वभुमी तयार झाली.

१५ वा लुई :-

त्या लुईच्या मृत्यनंतर फ्रान्सनंतर गादीवर आलेले सर्व राजे कर्तव्य शुन्य, चैनी विलासी असल्याने फ्रेंच राज्यक्रांती घडुन आली, चौदाव्या लुईच्या मृत्युवेळी फ्रेंच व फ्रान्सची तिजोरी रिकामी झाली होती त्याने मृत्युपुर्वी 'माझ्या सारखा युद्धकरण्याचा प्रयत्नकर' असा १५व्या लुईचा आर्थिक परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्नकर असा सल्ला

PAGE NO.:
DATE: / /

दिला होता. तथापि तो चैनी विलास अविचारी व्यसनी, स्वकारी दुराचारी असल्याने त्याने १५ व्या लुईच्या सल्ला मनाला नाही उलट त्याने सरकारी उत्पन्नाचा विचार न करता मोठा खर्च करण्यात सुरवात केली.

माझ्या नंतर प्रलय हे त्याच्या जीवनाचे तत्वज्ञान असल्याने त्याच्या राज्यकारभारातील एक सुत्रता नष्ट झाली त्यांच्या वाईट परिणाम जनतेला भोगावा लागला म्हणजेच जनतेचे न्याय मिळवण्यासाठी क्रांतीचा मार्ग स्वीकारला.

३) १६ व्या लुई :-

त्या लुईच्या मृत्यूनंतर इ.स. 1775 मध्ये वयाच्या २० व्या वर्षी १६ वा लुई फ्रान्सच्या गादीवर आला सद्गुणसंपन्न म्हणुन त्यांची ख्याती होती, तथापि त्याला राज्यकारभाराचे ज्ञान नव्हते; तो चैनी विलासी, व्यसनी आणि चंचल स्वभावाचा असल्याने मंत्रीमंडळाच्या बैठकीत तो रस घेत नसे सर्व राज्यकारभार, दिसायला सुंदर असलेली त्यांची पत्नी मेरीॲंटाईनेट राणीच्या तो ताब्यात होता राज्य करण्यापेक्षा सर्व विश्व माझ्यावर कोसळल्यावर सारखे वाटते, असे उद्गार १६ व्या लुईने काढले होते.

एका मंत्र्याने राजीनामा दिला असता तु किती नशीबवान आहे ; मलाही असा राजीनामा दिला आला असता तर किती बरे झाले असते असे त्यांना उद्गार काढले असेत. त्यामुळे राज्यकारभारात गोंधळ निर्माण होऊन क्रांतीला अनुकुल वातावरण तयार झाले वास्तविक त्याने खंबीर व कणखर धोरण जाहीर करून फ्रान्सचा राज्यकारभार करणे आवश्यक ते आहे. तथापि त्याच्याकडे यशस्वी राज्यकर्त्याच्या गुणाचा अभाव होता.

४) मेरी ॲटाईनेट :-

मेरी ॲटाई नेट ही ऑस्ट्रीयाची महाराणी मेरी थ्रेरेसची कन्या असुन 16 व्या लुईशी तिचा विवाह करण्यात आला. तिचे बालपण कडक्या शिस्तप्रिय आईच्या बंधनात गेल्यामुळे लग्नानंतर तिच्या स्वैर वागणुकीला धारावर आला तिने चैनीसाठी अपार पैसा खर्च केला तो अत्यंत धाडशी, महत्वाकांक्षा फायदा घेऊन ढोंगी आणि विलासी धर्मगुरुंच्या मदतीने राजकारणात हस्तक्षेप सुरु केला अत्यंत खर्चिक व उधळपट्टी करणाऱ्या मेरी ॲटाईनेटला फ्रेंच जनते बद्दल काडीची ही सहानुभुती नव्हती त्यामुळे ती प्रजेत अप्रिय ठरली भुकेने व्याकुळ झालेल्या लोकांच्या राजवाड्यावरील मोर्च्याला तिने 'तुम्हाला ब्रेड मीळत नसेल तर केक खा' 'भाकरी मीळत नसेल तर पुरीही खा' असे उद्दट उत्तर दिले होते.

तिने दरबारात प्रजेच्या हिताने कार्य न करता ती नेहमीच दरबारात स्तुती पाठकांच्या गराड्यात राहून गढू लागली राज्याच्या आर्थिक दिवाळखोरीस खऱ्या अर्थाने तीच कारणीभुत ठरली ती तुटीची राणी म्हणुन प्रसिद्ध झाली साहजिकच 16 व्या लुईपेक्षा तिलाच अधिक प्रमाणात फ्रेंच राज्यक्रांतीस जबाबदार धरले जाते.

5) भ्रष्ट राज्यकारभार :-

चैनी आणि पैशाची उधळपट्टी हे दरबारचे आणि राज्यकारभाराचे मुख्य मूळ होते. राजा पॅरिस राजधानी पासुन अकरा मैल दूर असलेल्या व्हर्साय राजवाड्यात विशेषत: प्रजेपासुन दूर राहिला. या राजवाड्यावर 30 कोटी रुपये खर्च केला होता. तो प्रजेपासुन दूर राहिलेल्या राज्यकारभारात सुसूत्रीपणा राहीला नाही अंदाजपत्रका बाबत किंवा आर्थिक व्यवहाराबाबत कोणतेही नियोजन

PAGE NO.:
DATE: / /

परस्परा बद्दल अविश्वास वाढुन भ्रष्टाचाराला वाव मिळाला राज्याला सर्व अधिकारी मानुन पैसाचा अपव्यय, लष्करी कार्यपद्धती आणि नोकरांची खप अधोरची सुरू झाली प्रशासकीय विभाग न्यायालयीन विभाग लष्करी विभाग यांच्यात गोंधळ निर्माण झाला त्यांच्यात गोंधळ निर्माण झाला त्यांच्यात कोण ही आपुलकी आत्मीयता वाढिली नाही. त्या मुळे भ्रष्ट राज्यकारणाला केटाळलेला जनतेचे क्रांतीचे हत्यार उपसले.

6) सरंजामशाही अर्थव्यवस्था :-

कृषी प्रधान शेतीची विभागणी अत्यंत विषय पद्धतीने झाली होती. प्रकुण, जमिनिच्या - जमीन लक्ष अमीर उमरावांकडे 20 टक्के धर्मगुरूकडे तर 20 टक्के जमीन 60 लक्ष शेतकऱ्यांकडे होती अमीर - उमराव यांची जमीन कश्यासाठी वडापक्षी - भुकास राबत होते. उत्पन्नांची साधने मुळभर व्यक्तींच्या हातात पुकवटली होती, भुकेल्या लोकांनी भाकरीसाठी करोयच्या राजवाड्यावर काढलेला मोर्चा हे फ्रान्सच्या विदारक आर्थिक परिस्थितीचे द्योतक होते सरंजामशाही अर्थव्यवस्था फ्रेंच क्रांतीस कारणीभुत ठरली.

7) राज्यकर्त्यांची धुंदरवार धोरणे व अकार्यक्षम नोकर :-

16 व्या लुईच्या विरोधामुळे सुधारणावादी पोटेस्टंट पंथाला फान्समध्ये फासमध्ये विस्तार करता आला नाही सेंट पायोलो या सु साधुच्या पुण्यस्मरणादिनी पॅरिस मध्ये धका शर्थीन पोटेस्टंट पंथाची मोठी कत्तल करण्यात आली, कॅथॉलिक धर्मपंथी यांनी आपली दहशत निर्माण केली, आपल्या धार्मिक कर्तव्यापासुन दुर ज्यांच्याकडे धर्म जागृतीचे कार्य तेच चैली, विलासी दरबारी बनले होते. थोड वयात मान, देवताचे अन्न विलास दुर्वोचे अशी परीस्थिती निर्माण झाली होती.

7/10

DATE 19/7/19

Name :- Omkar Sachin Palkhande
Roll no :- C5187 (फ्रेंच राज्यक्रांतीची कारने लिहा.)
Subject :- History
Class :- B.A - II (Sem - III)

प्रश्न फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा.

उत्तर 1) राजकीय कारणे !-

1) ब्युरबान घराण्याची जुलमी राजवट !-

फ्रान्सचे क्षेत्रफळ 2,12,000 चौरस मैल असून वातावरण सौम्य व आल्हाददायक आहे. उत्तर युरोप, मध्य युरोप व दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्समधून गेल्याने या देशाला महत्व प्राप्त दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्स मधून गेल्याने या देशाला महत्व प्राप्त झाले. युरोपातील छोट्या मोठ्या घटनांचे परिणाम फ्रान्स वर उमटत राहिले. 16 व्या शतकाच्या मध्यापासून फ्रान्समध्ये ब्युरबान घराण्याची राजवट सुरु झाली. इ.स 1553 ते 1793 पर्यंत सुमारे अडीचशे वर्ष या घराण्याने फ्रान्सवर अधिराज्य गाजविले या घराण्यातील राजे दैवी अधिकाराच्या सिद्धांताचे पुरस्कर्ते होते कोणत्याही आदेशाचा कायदेशीरपणा व बेकायदेशीरपणा हा राजाच्या शब्दावर अवलंबून होता. राजाचा शब्द प्रमाण मानला जाई ब्युरबॉन घराण्यातील राज्यकर्त्यांचा कालखंड पुढील प्रमाणे होता.

पहिला ब्युरबॉन राजा चौथा हेन्री सन 1553 ते 1610
तेरावा लुई सन 1610 ते 1643
चौदावा लुई सन 1643 ते 1715
पंधरावा लुई सन 1715 ते 1774
सोळावा लुई सन 1774 ते 1793

ब्युरबान घराण्यातील पहिल्या तीन राज्यकर्त्यांच्या कालखंडात फ्रान्सची शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती झाली उद्योगाचा हि विकास झाला पण नंतर राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणामुळे व जुलमी राजवटी मुळे फ्रान्स मध्ये क्रांतीचा उद्रेक झाला.

DATE / /

२) दैवी वरदानाचा सिध्दांत :- मध्ययुगीन कालखंडापासून फ्रेंच मधिल अनियंत्रित राजेशाही उदयास आली होती. राजा स्वतःलाच ईश्वराचा अंश मानत असे परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी आपणास पृथ्वीतलावर पाठविले आहे असे तो समजत असे. धर्माचा पगडा असणाऱ्या जनतेलाही हे मनोमन पटत होते. दैवी वरदानाच्या सिध्दांतामुळे राजाच्या गैरकृत्यावर पांघरूण घालण्यात येई. राजाशी द्रोह करणे म्हणजे साक्षात परमेश्वराशी द्रोह करण्यासारखे बाब होते. थोडक्यात दैवी वरदानाच्या सिध्दांत सत्तेची मक्तेदारी व वंश-परंपरागत प्रथा - यामुळे जनतेत प्रचंड प्रभाव निर्माण झाला

२] सामाजिक कारणे :-

१) सरंजामदार वर्ग :- क्रांती पूर्व फ्रेंच समाजाची स्थिती सरंजाम शाही स्वरुपाची होती अमीर-उमराव हा फ्रेन्च समाजातील पहिला वर्ग होय. हा वर्ग अत्यंत सधन व संपन्न जीवन जगत होता. सरंजामदार वर्गाची संख्या फ्रान्सच्या लोकसंख्येच्या शेकडा १ टक्क्याहून कमी असूनही यांच्याकडे देशाच्या ६० टक्क्याहून अधिक जमीन होती. तरीही हा सधन वर्ग करमुक्त होता. एवढेच नव्हेतर या वर्गाचा सर्वसामान्य जनतेवर -रली ( मालमत्तेवरील ) नावाचा कर होता. मुलकी व लष्करी प्रशासनातील वरिष्ठ जागा या वर्गाकडे होत्या. अशा परिस्थितीमुळे अमीर - उमराव हा वर्ग सम्राटप्रमाणेच चैन - विलास व ऐष आरामात जीवन जगत होता.

सरंजामदार वर्गाकडून सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत होती हा वर्ग कुळांकडून खंड वसूल करत असे. वेठबिगाराकडून शेतीची कामे करून घेई. सरंजामदारांना शिकारीचा शौक होता या शौकापायी शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होत असे ज्यांच्याकडे दाद मागावयाची त्यांच्याकडूनच अन्याय झाल्यास दाद मागणार कोणाकडे ?

सरंजामदार वर्गाविषयी माँटेस्क्यू म्हणतो " राजाशी बोलू शकणारा, मंत्र्यांशी संपर्क साधणारा आणि ज्याला कर्ज आणि पेन्शन त्याचबरोबर वाडवडिलार्जित हक्क आहेत अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय. " सरंजामदार वर्गाच्या छळाला कंटाळलेली सामान्य जनता क्रांतीसाठी उत्सुक झाली

२) धर्मगुरुंचा वर्ग :- फ्रेंच सामाजिक समाजातील हा दुसरा वर्ग होता. सरंजामदार

DATE / /

वर्गाप्रमाणेच हा वर्ग ही साधन व संपन्न होता वरिष्ठ, कनिष्ठ व ग्रामीण भागात धार्मिक कार्य करणारे धर्मगुरु हे अशा प्रकारात यांचे विभाजन झाले होते. वरिष्ठ धर्मगुरु हे आपला बहुतेक काळ राजधानीत घालवत असत. संख्येने अत्यल्प असणाऱ्या या वर्गाच्या हाती धार्मिक स्थळे होती रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने सरकार व जनतेवर कॅथॉलिक धर्माचा प्रभाव होता.

धर्मगुरुंची संख्या अत्यल्प असुनही २० टक्के जमीन त्यांच्या ताब्यात होती. उत्पादनाची साधने यांच्या हाती असुनही हा वर्ग करमुक्त होता. धर्मगुरुंना समाजात मान सन्मान प्रतिष्ठा व सधनता लाभली असल्यामुळे हा वर्ग चैनी, विलासी व अविचारी बनला होता. अशा परिस्थितीत १६ व्या लुईने सुधारणा वादी प्रोटेस्टंट पंथियांच्या मार्ग व पुजा स्वातंत्र्यावर निर्बंध लादले. विचार वंतांनी त्यांच्या धारणावर टिका केली. फिमरबोल त्याने कॅथॉलिक संघातील दोष व उणीवा दाखून दिल्या.

③ धार्मिक कारणे :-

1) चैनी, विलासी धर्मगुरुंचा वर्ग :- रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने राजकर्त्याप्रमाणेच समाजावर त्यांचा मोठा प्रभाव होता. धर्मगुरुंच्या वर्ग हा प्रस्थापित वर्ग होता धर्मस्थळे उत्पन्नाची साधने झाली होती. रोम मधील पोपपासून खेडे-गावातील पाद्र्यांपर्यंत धर्मसंस्थेची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. या धर्मसंस्थेत पोप त्या खालोखाल कार्डिनल, आर्च बिशप, आर्च डिकन, बिशप, डीकन, ॲबट यांची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. फ्रान्स मध्ये सुमारे दिड लाख धर्माधिकारी होते. धर्ममठांची संख्या पाच हजारांच्या घरात होती या मठामध्ये पंचवीस हजार अविवाहित मठवासी नर पस्तीस हजार अविवाहित मठवासीनींचे वास्तव्य होते. इतर धर्माधिकारी गृहस्थाश्रमी होते हे सर्वजण धर्मव्यवस्थेत कारभार चालवत होते.

१६ व्या लुईच्या विरोधामुळे सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाला फ्रांसमध्ये विस्तार करता आला नाही सेंट बार्थेलो या साधूच्या पुण्यस्मरणदिनी पॅरिस मध्ये

एका रात्रीत प्रोटेस्टंट पंथाची मोठी कत्तल करण्यात आली. कॅथॉलिक धर्मपंथी यांनी आपली दहशत निर्माण केली. आपल्या धार्मिक कर्तव्यापासून दूर गेलेल्या धर्मगुरू विषयी जनतेत प्रचंड क्षोभ निर्माण झाला. ज्यांच्याकडे धर्म जागृतीचे कार्य होते ते चैनी विलासी व स्वार्थी बनले होते. धार्मिक मठ ही ऐश्वर्याची व चैंगळवादाची [illegible] झाली होती. थोडक्यात 'नाव देवाचे अन् चिजस दुसऱ्याचे' अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

4) आर्थिक कारणे :-

1) सरंजामशाही अर्थव्यवस्था :- कृषी प्रधान फ्रान्सची शेतीची विभागणी अत्यंत विषम पद्धतीने झाली होती. एकूण जमिनीच्या ६० टक्के जमीन अमीर-उमरावांकडे २० टक्के धर्मगुरूंकडे तर २० टक्के जमीन ८० लक्ष शेतकऱ्यांकडे होती. अमीर-उमराव यांची जमीन कसण्यासाठी लक्षावधी वेठबिगार राबत होते. उत्पन्नाची साधने मूठभर व्यक्तींच्या हातात एकवटली होती. भुकेल्या लोकांनी भाकरीसाठी दुसऱ्याच्या राजवाड्यावर काढलेल्या मोर्चा हे फ्रान्सच्या विदारक आर्थिक परिस्थितीचे द्योतक होते. सरंजामशाही अर्थव्यवस्था ही फ्रेंच क्रांतीस कारणीभूत ठरली.

9/10

19/7/19

Subject :- फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा
Name :- सुशांत शिवाजी पाटील
Roll no - CS825 Subject :- History

प्रश्न :- फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा.
उत्तर :- (1) राजकीय कारणे →

i) ब्युरबॉन घराण्याची जुलमी राजवट :- फ्रान्सचे क्षेत्रफळ २,१२,००० चौरस मैल असून वातावरण सौम्य व आल्हाददायक आहे. उत्तर युरोप, मध्य युरोप व दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्समधून गेल्याने या देशाला महत्त्व प्राप्त दक्षिण युरोपातून पश्चिमेकडे जाणारे मार्ग फ्रान्स मधून गेल्याने या देशाला महत्त्व प्राप्त झाले. युरोपातील छोट्या-मोठ्या घटनांचे परिणाम फ्रान्सवर उमटत राहिले. १६ व्या शतकाच्या मध्यापासून फ्रान्समध्ये ब्युरबॉन घराण्याची राजवट सुरू झाली. ई.स. १५९३ ते १७८९ पर्यंत सुमारे अडीचशे वर्षे या घराण्याने फ्रान्सवर अधिराज्य गाजविले. त्या घराण्यातील राजे दैवी अधिकाराच्या सिद्धांताचे पुरस्कर्ते होते. कोणत्याही मोठ्या ... राजाच्या शब्दावर अवलंबून होता. राजाचा शब्द प्रमाण मानला जाई. ब्युरबॉन घराण्यातील कार्यकर्त्यांचा कालखंड पुढीलप्रमाणे होता.

पहिला ब्युरबॉन राजा चौथा हेन्री सन १५९३ ते १६१०
तेरावा लुई सन १६१० ते १६४३
चौदावा लुई सन १६४३ ते १७१५
पंधरावा लुई सन १७१५ ते १७७४
सोळावा लुई सन १७७४ ते १७९३.

ब्युरबॉन घराण्यातील पहिल्या तीन राज्यकर्त्यांच्या कालखंडात फ्रान्सची शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती झाली. उद्योगाचा विकास झाला पण नंतर राज्यकर्त्यांच्या युद्धखोर धोरणामुळे व जुलमी राजवटीमुळे फ्रान्समध्ये क्रांतीचा उद्रेक झाला.

ii) दैवी वरदानाचा सिद्धांत :- मध्ययुगीन कालखंडापासून फ्रेंच मधील नियंत्रित राजशाही उदयास आली होती. राजा स्वतःला ईश्वराचा अंश मानत असे. परमेश्वरानेच राज्यकारभारासाठी आपणास पृथ्वीतलावर पाठविले आहे असे तो समजत असे. धर्माचा पगडा असणाऱ्या जनतेलाही हे मनोमन पटत होते. दैवी वरदानाच्या सिद्धांतामुळे राजाच्या

गैरकृत्यावर पांघरूण घालण्यात येई. राजाशी द्रोह करणे म्हणजे साक्षात परमेश्वराशी द्रोह करण्यासारखे वाटत होते. शोडवंशात दैवी वरदानांचा सिद्धांत सत्तेची मक्तेदारी व वंशपरंपरागत प्रथा यामुळे जनतेच्या प्रचंड प्रमाणात असंतोष निर्माण झाला.

② सामाजिक कारणे

i) सरंजामदार वर्ग :- क्रांतीपूर्व फ्रेंच समाजाची रचना सरंजामशाही स्वरूपाची होती. अमीर उमराव हा फ्रेंच समाजातील पहिला वर्ग होय. हा वर्ग अत्यंत सधन व संपन्न जीवन जगत होता. सरंजामदार वर्गाची संख्या फ्रान्सच्या लोकसंख्येच्या शेकडा १६ टक्क्याहुनही कमी असूनही यांच्याकडे देशाच्या ६० टक्क्याहून अधिक जमीन होती. तरीही हा सधन वर्ग करमुक्त होता. एवढेच नव्हे तर या वर्गाचा सर्वसामान्य जनतेवर हॅली (मालमत्तावरील) नावाचा कर होता. मुलकी व लष्करी प्रशासनातील वरील जागा याच वर्गाकडे होत्या. अशा परिस्थितीमुळे अमीर - उमराव हा वर्ग सम्राटाप्रमाणेच चैन - विलासात व ऐशआरामात जीवन जगत होता.

सरंजामदार वर्गाकडून सर्वसामान्य जनतेची पिळवणूक होत होती. हा वर्ग कुळांकडून खंड वसूल करत असे. वेठबिगारांकडून शेतीची कामे करून घेई. सरंजामदारांना शिकारीचा शौक होई. या शौकापायी शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होत असे. ज्यांच्याकडे दाद मागायची त्यांच्याकडूनच अन्याय झाल्यास दाद मागणार कोणाकडे ? सरंजामदार वर्गाविषयी मॉटेस्क्यू म्हणतो " राजाशी बोलु बोलु शकणारा, मंत्र्यांशी संपर्क साधणारा आणि ज्याला कर्ज आणि पेन्शन त्याचबरोबर वृडिभाजित हक्क आहेत अशी व्यक्ती म्हणजे सरंजामदार होय. सरंजामदार वर्गाच्या छळाला कंटाळलेली सामान्य जनता क्रांतीसाठी उद्युक्त झाली.

ii) धर्मगुरूंचा वर्ग :- फ्रेंच समाजातील हा दुसरा वर्ग होता. सरंजामदार वर्गाप्रमाणेच हा वर्ग ही सधन व संपन्न होता. वरिष्ठ, कनिष्ठ व ग्रामीण भागात धार्मिक कार्य करणारे धर्मगुरू अशा प्रकारांनीत यांचे विभाजन झाले होते. वरिष्ठ धर्मगुरू हे आपला बहुतेक काळ राजधानीत घालवत असत. संख्येने अत्यल्प असणाऱ्या या वर्गाच्या हाती धार्मिक सत्ता होती. रोमन कॅथलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने

सरकार व जनतेवर कॅथॉलिक धर्माचा प्रभाव होता.

धर्मगुरूंची संख्या अत्यल्प असूनही 20 टक्के जमीन त्यांच्या ताब्यात होती. उत्पादनाची साधने त्यांच्या हाती असूनही हा वर्ग करमुक्त होता. धर्मगुरूंना समाजात मान, सन्मान, प्रतिष्ठा व सधनता लाभली असल्यामुळे हा वर्ग चैनी - विलासी व अविचारी बनला होता. अशा परिस्थिती १६व्या लुईने सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथियांच्या मत व पुना स्वातंत्र्यावर निर्बंध लादले. विचारवंतांनी राज्याच्या धोरणावर टिका केली. पिअरबेल याने कॅथॉलिक पंथातील दोष व उणिवा दाखवून दिल्या.

3) धार्मिक कारणे :-

i) चैनी - विलासी धर्मगुरूंचा वर्ग :- रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म असल्याने राज्यकर्त्यांप्रमाणेच समाजावर त्यांचा मोठा प्रभाव होता. धर्मगुरूंचा वर्ग हा प्रस्थापित वर्ग होता. धर्मस्थळे, उत्पन्नाची साधने, शाळा होती. रोममधील पोप पासून खेडेगावापर्यंत धर्मसंस्थेची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. या धर्मसंस्थेत पोप त्यांच्या खाल कार्डिनल, आर्च बिशप, आर्च डिकन, बिशप, डीकन ॲबट यांची भक्कम अशी साखळी निर्माण झाली होती. फ्रान्स मध्ये सुमारे दीड लाख धर्माधिकारी होते. धर्ममठांची संख्या पाच हजारच्या घरात होती. या मठामध्ये पंचवीस हजार अविवाहीत सहवासी तर पस्तीस हजार अविवाही मठवासींनीचे वास्तव्य होते. इतर धर्माधिकारी गृहस्थाश्रमी होते. हे सर्वजण धर्मव्यवस्थेचा कारभार चालवत होते.

१६व्या लुईच्या विरोधामुळे सुधारणावादी प्रोटेस्टंट पंथाला फ्रान्समध्ये विस्तार करता आला नाही. धार्मिक मठ हे लोकशाहीची व चंगळवादाची ठाणी झाली होती. थोडक्यात नाव देवाचे जन विलास बुवाचे अशी परिस्थिती निर्माण झाली होती.

4) आर्थिक कारणे :-

i) सरंजामशाही अर्थव्यवस्था :- कृषिप्रधान फ्रान्सची शेतीचा विभागणी अत्यंत विषम पद्धतीने झाली होती. एकूण जमीनीच्या 60 टक्के जमीन अमीर - उमरावांकडे 20 टक्के धर्मगुरूंकडे तर 20 टक्के जमीन 80 लक्ष शेतकऱ्यांकडे होती. अमीर उमराव यांची जमीन कसण्यासाठी सदावधी गुलाम राबत होते. उत्पन्नाची साधने मुठभर

व्यक्तींच्या हातात राजवाड्यावर काढलेल्या मोर्चा हे फ्रान्सच्या विदारक आर्थिक परिस्थितीचे द्योतक होते. सरंजामशाही अर्थव्यवस्था फ्रेंच क्रांतीस कारणीभूत ठरली.

10/10

Page No.
Date 19.7.2019

Name = Kajal Parashram kamble
class - B.A. -II , Roll No - 5096
sub - History.
Assingment Name - फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे.

प्रश्न - फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे -

→ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे :-

राजकीय, सामाजिक, धार्मिक, वैचारिक, आणि आर्थिक

(I) राजकीय कारणे :-

(१) ब्युरबॉन घराण्याची जुलमी राजवट :-

फ्रान्समध्ये ब्युरबॉन घराण्याची जुलमी राजवट (१५५९-१७९३) अडीचशे वर्ष अस्तित्वात होती. या घराण्यातील राज्यकर्ते दैवी अधिकाराच्या सिद्धान्ताचे पुरस्कर्ते होते. कोणत्याही गोष्टीचा कायदेशीरपणा किंवा बेकायदेशीरपणा हा केवळ राजाच्या आवडीवर ठरत असे. राजाचा शब्द म्हणजे कायदा होता. ब्युरबॉन घराण्यातील राज्यकर्त्यांनी सन १६१४ पासून इस्टेट्स जनरलचे अधिवेशन बोलविले नव्हते त्यामुळे राज्यकर्ते अनियंत्रित सत्ताधीश बनले. ब्युरबॉन राजा चौथा हेन्री, तेरावा लुई, चौदावा लुई यांच्या कालखंडात फ्रान्सची औद्योगिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उन्नती झाली. या काळात वसाहतवादाचा पुरस्कारही करण्यात आला. मात्र पंधराव्या व सोळाव्या लुईच्या जुलमी राजवटीमुळे क्रांतीचा उद्रेक झाला.

(२) कायदा व न्यायव्यवस्था :-

राजाचा शब्द म्हणजे कायदा अशी परिस्थिती होती. उमराव व धर्मगुरूंसाठी वेगळे कायदे होते. प्रत्येक प्रांतात वेगवेगळी कायदेपद्धती अस्तित्वात होती. फ्रान्समध्ये शेकडो कायदेसंहिता अस्तित्वात होत्या. सर्व देशभर एकच कायदेपद्धती अस्तित्वात नव्हती. थोडक्यात फ्रान्समधील कायदे संदिग्ध, अनिश्चित, जुलमी, विषम होते. या कायदेपद्धती बद्दल बोलताना व्हॉल्टेअर म्हणतो, "फ्रान्समधील प्रवास करताना जितक्या वेळा घोडे बदलावे लागतात त्याहून अधिक कायदापद्धतीतील बदल दिसून येतो."

फ्रान्समधील कायद्यासमानेच न्यायव्यवस्थेचीही परिस्थिती होती. न्यायव्यवस्था सदोष होती. प्रांत, जिल्हा, पॅरिस, कम्युन ही

शासकीय न्यायालये होती. त्याचप्रमाणे राजकीय, लष्करी, धार्मिक, न्यायालये होती. न्यायाधिशपदी अमीर-उमराव व राजकुटुंबातील लोकांचीच वर्णी लागत असे. न्यायव्यवस्थेत कसलीही एकवाक्यता नव्हती.

(३) दैवी अधिकाराचा सिद्धान्त :-

मध्ययुगीन काळापासून फ्रान्समध्ये अनियंत्रित राजेशाहीचा उदय झाला होता. राजा हा ईश्वराचा अंश असून परमेश्वरानेच त्यास राज्यकारभारासाठी पृथ्वीतलावर पाठविले आहे असे समजले जाई. दैवी वरदानाच्या सिद्धांतामुळे राजाच्या गैरकृत्यावर पांघरूण घातले जाई. राजाशी द्रोह करणे म्हणजे साक्षात परमेश्वराशी द्रोह करण्यासारखे होते. थोडक्यात दैवी वरदानाचा सिद्धांत, वंशपरंपरागत प्रथा व सत्तेची मक्तेदारी यामुळे जनतेत असंतोष निर्माण झाला.

(४) युद्धखोर धोरणे :-

ब्युरबॉन घराण्यातील राज्यकर्त्यांनी साम्राज्यवादी धोरणाचा अवलंब केला. आशिया, आफ्रिका खंडात वसाहतवादाच्या वसाहती निर्माण केल्या. फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीने वसाहतवादाच्या प्रभावाखाली अनेक युरोपीय हातभार लावला. वसाहतवादाच्या प्रभावावरून अनेक युरोपीय राष्ट्रांशी फ्रान्सची युद्धे झाली. या युद्धांमुळे प्रचंड आर्थिक नुकसान फ्रान्सला सहन करावे लागले. भारतात वर्चस्व प्रस्थापित करण्यावरून सन १७४८-१७६३ या काळात इंग्लंड-फ्रान्समध्ये सप्तवार्षिक युद्ध झाले. आणि यामध्ये फ्रान्सला पराभवास सामोरे जावे लागले.

(५) प्रशासनातील गोंधळ :-

ब्युरबॉन घराण्यातील राज्यकर्त्यांच्या काळात फ्रान्समधील शासनव्यवस्थेत प्रचंड गोंधळ निर्माण झाला. शासन व्यवस्थेत वारंवार परिवर्तन होत असल्यामुळे शासन-व्यवस्था भ्रष्ट बनली. अधिकारी मनमानीपणे कारभार करू लागले. अमीर-उमराव, धर्मगुरू व जमीनदार यांचे राज्यकारभारावर वर्चस्व निर्माण झाले. अधिकारी राजाची मर्जी सांभाळण्यात मग्न होते. सर्वसामान्य जनतेला राज्यकारभारात कुठल्याही प्रकारचे स्थान नव्हते. फ्रान्सचे ४० प्रांत व ३६ जनरॅलिटीजमध्ये विभागणी झाली होती.

(६) मेरी अँन्टाइनेट (१७५५-१७९३).

मेरी ही ऑस्ट्रियन सम्राज्ञी मेरिया थेरेसाची मुलगी होती. ऑस्ट्रिया व फ्रान्स यांच्यात नेहमी

Page No.
Date

युद्धे होत. या दोन्ही राष्ट्रांत मैत्रीचे संबंध निर्माण व्हावेत यासाठी मेरी व सोळाव्या लुईचा विवाह लावण्यात आला. मेरीला माहेरची ओढ व अहंकार होता. फ्रेंच जनतेशी ती कधीही एकरूप झाली नाही. मेरी अत्यंत रूपवान होती. साहजिकच लुईवर तिचा पगडा निर्माण झाला. मेरी बुद्धीमान अहंकारी, चैनी, विलासी, व राजकारणाची आवड असणारी होती. मेरीच्या चैनी वृत्तीमुळे फ्रान्सच्या तिजोरीत खडखडाट निर्माण झाला. म्हणून लोक मेरीला 'तुटीची राणी' असे म्हणत असत.

(७) सोळावा लुई :-

क्रांतीसमयी सोळावा लुई राज्यकर्ता असला तरीही क्रांतीची पार्श्वभूमी त्यापूर्वीपासून निर्माण झाली होती. राजास राजकारणाची फारशी आवड नव्हती. मात्र परिस्थितीमुळे तो जुलमी बनत गेला. तो शक्तीबाहु असून त्यास कुलपे दुरुस्त करण्याचा व शिकारीचा छंद होता. अशा लुईचा रूपवान व धूर्त मेरी अँन्टाईनेटशी विवाह झाला. सोळाव्या लुईचा राज्याभिषेक झाला त्यावेळी तो म्हणाला, "सर्व विश्व माझ्यावर कोसळलेले आहे. मला [illegible] वाचव."

(II) सामाजिक कारणे :

(१) सरंजामदार वर्ग :-

क्रांतीपूर्व फ्रेंच समाजाची रचना सरंजामी स्वरूपाची होती. त्यामुळे फ्रेंच समाजात सरंजामदार, धर्मगुरू व सामान्य जनता असे तीन वर्ग निर्माण झाले होते. अमीर उमराव हा फ्रेंच समाजातील पहिला वर्ग होय. हा वर्ग सधन व संपन्न होता. तरीही हा वर्ग करमुक्त होता. एवढेच नव्हे तर अमीर-उमराव वर्गाचा सर्वसामान्य जनतेवर 'टॅली' (मालमत्तेवरील) नावाचा कर होता.

सरंजामदार वर्गाची संख्या एक टक्क्याहूनही कमी असताना साठ टक्क्याहून अधिक जमीन त्यांच्या मालकीची होती. या जमीनीवर ते कुळांना राबवून घेत होते. कुळांकडून खंड, नजराणा वसूल केला जाई.

(२) धर्मगुरूंचा वर्ग :-

रोमन कॅथॉलिक हा फ्रान्सचा राष्ट्रधर्म होता. सरकार व जनतेवर धर्माचा मोठा प्रभाव होता. धर्मस्थळे व एकूण जमिनीचा पाचवा हिस्सा धर्मगुरूंच्या ताब्यात होता. हा वर्ग कमकुवत होता. सर्वसामान्य जनतेवर या वर्गाचा

'टाईथ' (धार्मिक कर) नावाचा कर होता. धर्मगुरु धार्मिक कर्तव्यापासून अलिप्त होते. समाजावर असणाऱ्या धर्मप्रभावा फायदा धर्मसंस्थेने उठविला.

(४) सामाजिक विषमता :-

फ्रान्समधील सामाजिक विषमता क्रांतीसाठी महत्त्वपूर्ण ठरली. अमीर उमराव, धर्मगुरु व प्रशासनातील अधिकारी हे वरिष्ठ श्रेणीत मोडत होते. या वर्गाकडे भरपूर संपत्ती होती, तरीही ते करापासून मुक्त होते. तर दुसरीकडे सर्वसामान्य जनता मात्र उपासीपोटी जीवन जगत होती. फ्रेंच समाजात निर्माण झालेली ही विषमतेची दरी दिवसेंदिवस वाढत गेली. फ्रान्समध्ये मध्यमवर्गाचा क्रांतिपूर्व काळात उदय झाला.

(III) धार्मिक कारणे :-

(१) चैनी, विलासी धर्मगुरुंचा वर्ग :-

धर्मगुरुंचा वर्ग हा फ्रान्समधील प्रस्थापित वर्ग होय. फ्रान्समध्ये सुमारे दीड लाख धर्माधिकारी होते. तर देशातील धार्मिक मठांची संख्या पाच हजार होती. या मठांमध्ये पंचवीस हजार अविवाहित मठवासी व पस्तीस हजार अविवाहित मठवासिनी होत्या. नंतर इतर गृहस्थाश्रमी होते. हे सर्वजण धर्मव्यवस्थेचा कारभार चालवत. फ्रान्समधील धर्मसंस्था बळकट बनली होती.

(IV) वैचारिक कारणे :-

(१) मॉटेस्क्यू (१६८९ ते १७५५)

मॉटेस्क्यूचा जन्म एका उमराव घराण्यात झाला. मॉटेस्क्यू व्यवसायाने वकील होता. त्याने न्यायाधीश पदही भूषविले. इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र व कायद्याचा अभ्यास केला. सन १७४८ मध्ये 'Spirit of the Laws' (कायद्याचा आत्मा) हा राज्यशास्त्रावरील अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथास अत्यंत लोकप्रियता मिळाली. त्याच्या एका वर्षात १८ आवृत्त्या निघाल्या. मॉटेस्क्यूने अनियंत्रित हुकूमशाहीचा धिक्कार केला.

(२) फ्रेने (१६९४ ते १७७४)

फ्रेनेचा वैद्यकीय व्यवसाय होता.

त्याने फ्रान्समधील आर्थिक परिस्थितीचा सखोल अभ्यास केला. तो म्हणतो फ्रान्सची अर्थव्यवस्था भक्कम करावयाची असेल तर शेती, व्यापार व उद्योग यांवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे. आर्थिक दृष्ट्या राष्ट्राला सबल करणारी ही क्षेत्रे स्वतंत्र ठेवली पाहिजेत. त्यांना पुरेसे स्वातंत्र्य दिले पाहिजे.

(३) रूसो (१७१२ ते १७७८)

जॅकेस रूसो हा आधुनिक युगातील महान राजकीय विचारवंत होय. रूसोचा जन्म जिनेव्हा येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. त्याचे आयुष्य अत्यंत हालअपेष्टेत गेले. पुढील काळात रूसो फ्रान्समध्ये येऊन स्थायिक झाला. आयुष्याच्या उत्तरार्धात रूसोने जीवनाश पूर्णपणे बाहून घेतले. 'माय कन्फेशन्स' नावाचे त्याने आत्मचरित्र लिहिले.

(V) आर्थिक कारणे :

(१) सरंजामशाही अर्थव्यवस्था :-

फ्रान्स हा कृषिप्रधान देश होता. देशातील एकूण जमिनीपैकी ६०% उमरावांकडे, २०% चर्चकडे आणि केवळ २०% जमिन ८० लाख शेतकऱ्यांकडे होती. उमरावां-च्याकडे असणारी जमीन कसण्यासाठी १० लाख कुळदास होते. शेतकऱ्यांना शासनास कर द्यावा लागत होता. अमीर - उमराव व धर्मगुरू यांनाही शेतकरी कर देत होते. राज्यकर्त्यांनी शेती सुधारण्याचे कोणतेही प्रयत्न केले नाहीत.

(२) असंतुष्ट व्यापारीवर्ग :-

फ्रान्समध्ये खनिज संपत्ती विपुल होती. होन, सीन, लुआर, बाल्की यांसारख्या नद्या तसेच अटलांटिक भूमध्य समुद्राचा किनारा लाभल्यामुळे व्यापाराची भरभराट झाली होती. पॅरिस, रूआ, लिआ, दीपल यांसारखी शहरे व बंदरे फ्रान्सला मिळाली होती. रेशीम, सुती कापड, लाकडी फर्निचर, पोलादी, अवजारे व उंची मद्य यांचा व्यापार भरभराटीस आला होता. परदेशी व्यापारासाठी फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना करण्यात आली होती.

(३) कर व्यवस्थेतील विषमता :-

क्रांतीपूर्व काळात फ्रान्समध्ये करपद्धतीत कमालीची विषमता होती. कराच्या ओझ्याखाली सामान्य माणूस दबला गेला होता. राजाचे नातलग, मंत्री, अमीर-उमराव व धर्मगुरू या वर्गावर नाममात्र स्वरूपाचे कर होते. कर व्यवस्थेत कमालीची विषमता होती. सामान्य माणसाचे ८०% उत्पन्न करामध्येच संपुष्टात येई. करांच्या बाबतीत कोणतीही नियमावली नव्हती. सरकारी अधिकारी अमानुष-पणे कर वसूल करीत..

10/10 ①

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class B.A.-II Paper No: 3 दि. 19-7-2019 Roll No. 5226

Suppliment No. आधुनिक युरोपचा इतिहास Subject History

Name Rajnandini Ramesh Salokhe.

प्र. फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे लिहा.

फ्रेंच जनता वर्षानुवर्षे अत्याचाराखाली भरडली जात होती. त्यांची जीवनमूल्ये पायदळी तुडवली जात होती. शेवटी जीवनापेक्षा जीवन जगण्याची मूल्ये महत्त्वाची असतात. हे ज्यावेळी जनतेला कळले त्यावेळी लाचारीचे जीवन जगण्यापेक्षा / अत्याचार सहन करण्यापेक्षा जीवनमूल्ये जिवंत ठेवण्यासाठी जुलूमशाहीला, मृत्यूला सामोरे जाण्याचे ठरवले. यातूनच क्रांतीची पार्श्वभूमी तयार झाली.

फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

राजकीय सामाजिक आर्थिक वैचारिक धार्मिक

अ) राजकीय कारणे :

i) अनियंत्रित राजेशाही :

फ्रान्समध्ये लुई घराण्याने अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार करून राज्यकारभार केला. १४ वा लुई अत्यंत घमेंडखोर आणि लहरी होता. त्याने सतत युद्ध करून फ्रान्सची तिजोरी रिकामी केली, प्रजेला महत्त्व न देता आपल्या इच्छेनुसार राज्यकारभार केला. तो राज्य आणि राजा यांना एकच समजत असे. परंतु त्याच्यानंतर १५ व्या व १६ व्या लुईच्या काळात राजकीय अस्थिरता

निर्माण होऊन फ्रेंच राज्यक्रांतीची पार्श्वभूमी तयार झाली.

ii) १५ वा लुई:

१५ व्या लुईने सरकारी उत्पन्नाचा विचार न करता मोठा खर्च करण्यास सुरुवात केली. प्रसंगी जनतेवर कर बसवून पैसा गोळा केला. त्याचे राज्यकारभाराकडे / न्याय व्यवस्थेकडे अजिबात लक्ष नव्हते. त्याच्या कारकिर्दीत राज्य कारभारात कमालीचा गोंधळ निर्माण होऊन राज्यकारभाराची एकसूत्रता नष्ट झाली. याचा वाईट परिणाम जनतेला भोगावा लागला.

iii) १६ वा लुई

१६ व्या लुईला राज्यकारभाराचे ज्ञान नव्हते. तो मंत्रिमंडळाच्या बैठकीत रस घेत नसे. सर्व राज्यकारभार त्याची पत्नी मेरी ॲन्टाईनेट राणीच्या ताब्यात होता. वास्तविक त्याने खंबीर व कणखर धोरण जाहिर करुन फ्रान्सच्या राज्यकारभार करणे आवश्यक होते. तथापि त्याच्याकडे यशस्वी राज्यकर्त्याच्या गुणांचा अभाव होता. त्यामुळे क्रांती अटळ ठरली.

iv) मेरी ॲन्टाईनेट :

मेरी ॲन्टाईनेट ही ऑस्ट्रीयाची महाराणी मेरीआ थेरेसाची कन्या असून १६ व्या लुईशी तिचा विवाह करण्यात आला. भुकेने व्याकूळ झालेल्या लोकांच्या राजवाड्यावरील मोर्च्याला तिने तुम्हाला ब्रेड मिळत नसेल तर केक खा असे उद्धट उत्तर दिले. राज्याच्या आर्थिक दिवाळखोरीस खऱ्या अर्थाने तीच कारणीभूत ठरली. ती तुटीची राणी म्हणून प्रसिद्ध झाली.

v) भ्रष्ट राज्यकारभार :

राज्यकारभारात अंदाजपत्रकाबाबत / आर्थिक व्यवहाराबाबत कोणतेही नियोजन नव्हते. एका खात्याचा दुसऱ्या खात्याशी संबंध नव्हता. परस्परांबद्दल अविश्वास वाढून भ्रष्टाचाराला वाव मिळाला. प्रशासकीय विभाग, न्यायालयीन विभाग, लष्करी विभाग यांच्यात गोंधळ निर्माण झाला.

vi) सदोष कायदे आणि न्यायपद्धती :

भ्रष्ट राज्यकारभाराप्रमाणे फ्रान्समधील न्यायपद्धती सदोष होती. कायदे व न्यायालयात दोष होते, कायदे अत्यंत जुलमी व अन्यायकारक होते. साध्या गुन्ह्यासाठी अतिशय क्रूर शिक्षा दिली जात होती. प्रसंगी सरदार व सरंजामदार न्यायाचे काम करत असल्याने सामान्य लोकांना न्याय मिळवणे अत्यंत दुरापास्त होते.

vii) अकार्यक्षम लष्कर :

फ्रान्सचे लष्कर अकार्यक्षम होते. राजाचे सैन्य, उमरावाचे सैन्य तर कधी धर्मगुरुचे सैन्य अशा प्रकारचे स्वरूप लष्कराला प्राप्त झाले. सैन्यात शिस्त नसून राष्ट्रीय भावनेचा अभाव होता, तसेच त्यांच्याकडून जनतेला वाईट वागणूक मिळत असे.

viii) प्रशासनातील इतर दोष:

फ्रान्सच्या सर्व भागात विविध प्रकारचे कर होते. या करांपासून श्रीमंत लोक मुक्त होते तर गरीब जनतेवर कराचे ओझे लादले होते, तसेच वजनमापे सुद्धा एकसारखी नव्हती, स्थानिक स्वराज्य संस्थात एकसूत्रीपणा नव्हता.

ब) सामाजिक कारणे:

i) सरंजामदार वर्ग:

या वर्गाची लोकसंख्या शेकडा १% हून कमी असूनही या वर्गाकडे ६०% जमीन होती. त्यांना मासेमारी व शिकारीचे विशेष अधिकार होते. रस्त्यात सरंजामदार भेटल्यास त्याला वाकून नमस्कार करावा लागे, त्याला बसण्यासाठी खास जागा द्यावी लागे. अमरावांचे सामान्य जनतेवर वर्चस्व होते

ii) धर्मगुरूंचा वर्ग:

या वर्गाने धर्मामध्ये अनाचार करून नैतिकता धुळीस मिळवली. त्यामुळे अनेकांनी त्यांच्यावर टीका केली. या वर्गाने कर्तव्याकडे दुर्लक्ष करून सामान्य जनतेवर अधिकार गाजवले त्यामुळे त्यांच्यावरील विश्वास नष्ट होऊन समाजात त्यांच्या विरुद्ध तिरस्काराची भावना वाढीस लागली.

iii) श्रमजीवी वर्ग -

क) मध्यम वर्ग: या वर्गामध्ये उद्योगपती, व्यापारी, डॉक्टर, वकील, प्रशासकीय अधिकारी इ. या अंतर्भाव होता. याच वर्गात अनेक लेखक, विचारवंत निर्माण होऊन त्यांनी प्रचलित समाजव्यवस्था बदलून टाकण्यासाठी समाजजागृती घडवून आणली.

ख) कामगार वर्ग: या वर्गाची संख्या अंदाजे ६ लाख असून त्यांना दररोज १६-१८ तास काम करावे लागत असे. रोगराई उपासमार इ. संकटे त्यांच्यापुढे असत. आपल्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी कामगार संघटना उभ्या करता येत नव्हत्या. त्यांची आर्थिक स्थिती नाजूक होती.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class ______ Div ______ Roll No. ______
Suppliment No. (1) ______ Subject ______
Test / Tutorial No. ______

ग) शेतकरी वर्ग :

सर्व करांचा बोजा या वर्गाच्या डोक्यावर होता. त्यांचे घर झोपडीचे असून त्यांचा आहार अत्यंत निकृष्ट दर्जाचा होता. त्यांच्याकडे छोटासा जमीनीचा तुकडा असून ते सरंजाम दारांच्या शेतीवर राबत असत, कामासाठी शेतमजूरांना भटकंती करावी लागत असे, त्यांना जनावरे देखील पाळता येत नव्हती.

क) आर्थिक कारणे

i) राज्यकर्त्यांचे अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष :

इ.स. १७७४ साली १६ व्या लुईने तुर्गोची अर्थमंत्री पदावर नियुक्ती केली. तुर्गोनंतर नेकर अर्थमंत्री पदावर आला. नेकर नंतर कालोनची अर्थमंत्री म्हणून नियुक्ती झाली. १७८९ मध्ये फ्रान्सला कर्जाचे व्याज म्हणून ३० कोटी रु. द्यावे लागत होते अशा कठीण आर्थिक परिस्थीतीला तोंड देण्यासाठी धर्मगुरु आणि उमराव यांच्यावर कर बसवणे आवश्यक होते.

ii) अन्यायी करपद्धती :

गरीब वर्गाला उत्पन्नाच्या १/१२ हिस्सा धार्मिक कर म्हणून धर्मगुरुंना द्यावा लागत होता. जमीनदार कुळाकडून खंड वसूल करत. शेतकऱ्याला जमीनदाराकडे वेठबिगारी करावी लागत. उमराव आपल्या कुळाकडून खंड वसूल करीत. त्यांच्या मुलांना विवाहप्रसंगी भेटवस्तू द्यावी लागत होती.

(65)

iii) राज्यकर्त्यांची उधळपट्टी :

मेरी ॲंटाईनेट या राणीच्या सेवेसाठी ५०० तर तिच्या ६ वर्षाच्या मुलीच्या सेवेसाठी ८० सेवक होते. याशिवाय वाहनांचा ताफा वेगळाच असे. राणीच्या मर्जीतल्या उमरावांनी अनेक मार्गाने राणीकडून प्रचंड संपत्ती मिळवली. तिने जुगारासाठी अफाट पैसा खर्च केला.

ड) धार्मिक कारणे :

धर्मसंस्थेतील विषमता धर्मगुरूंचे विलासीजीवन, नैतिक अधःपतन, श्रेष्ठ- कनिष्ठता इ. घटकांनी क्रांतीसाठी हातभार लावला. धर्मसंस्थेच्या ढिसाळपणावर जनता नाराज झाली. लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य व व्यक्तिस्वातंत्र्य धोक्यात आले. फ्रान्स मध्ये कॅथोलिक पंथियांना महत्त्वाचे स्थान होते. तर प्रोटेस्टंट पंथावर बंदी घालून या पंथाच्या लोकांना कडक शिक्षा दिली जात होती.

इ) वैचारिक कारणे :

विचारवंतांच्या लिखाणामुळे असंतोषाला वाचा फुटली, राजसत्तेचे दोष, सामाजिक विषमता, लोकांवरील जुलूम उजेडात आले लोकांमधील न्यूनगंडाची भावना नष्ट होऊन धर्मसत्तेला व राजसत्तेला वठणीवर आणण्यासाठी जनता दंड थोपटून आव्हान उभी राहिली. लोकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता इ. वैचारिक मूल्ये मिळवून देण्याचे महान कार्य रूसो, व्हॉल्टेअर, मॉंटेस्क्यू, क्वेने, हेल्वेझ्यस, ॲलपॉक इ. चा समावेश होतो.

इ. स. १७८९ साली फ्रान्समध्ये झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीला केवळ युरोपच्याच नव्हे तर जगाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते. कारण या क्रांतीने जुन्या कल्पना, रुढी, परंपरा, राजकीय, सामाजिक व आर्थिक

विषमता, अनियंत्रित राजेशाही, धर्मसत्तेचा प्रभाव इ.ना मूठमाती देऊन अखिल मानव समाज ढवळून निघाला आणि नवसमाज निर्मिती केली.